## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागात दिनांक २४ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन सप्ताहाचे औचित्य साधून स्वलिखित काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर अंतर विद्याशाखीय प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनीषा इंदाणी, प्रमुख अतिथी डॉ. रंजना सोनवणे, प्राचार्य, व्ही. पी. होले, शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. स्वाती तायडे व डॉ. रणजित पारधे हे उपस्थित होते.

डॉ. रंजना सोनवणे बोलताना म्हणाल्या की, मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची ओळख आहे. विद्यार्थ्यांनी शुद्ध, समृद्ध आणि अभिव्यक्तिपूर्ण मराठीचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवून साहित्यप्रेम निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असेही त्या म्हणाल्या

अध्यक्षीय भाषणात डॉ. मनीषा इंदाणी यांनी विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याचे कौतुक करताना मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. मराठी साहित्य, काव्य, कथा आणि चरित्रग्रंथ यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होतो, असे सांगत त्यांनी नियमित लेखन, वाचन आणि वक्तृत्व यांवर भर देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिच्या समृद्ध परंपरेचा वारसा पुढे न्यावा कारण साहित्य ही व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी साधना असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, स्त्री-सशक्तीकरण, ग्रामीण जीवन, शिक्षणव्यवस्था तसेच युवकांच्या भावना अशा विविध विषयांवर स्वलिखित कविता सादर केल्या, यात रवींद्र वळवी, राहुल वळवी, सोपान चव्हाण, भूषण अहिरे, जागृती भामरे, दामिनी सोनवणे, योगिता अहिरे, ललिता देसाई, सरिता इंगळे, आम्रपाली जाधव, विरसिंग पावरा, प्रकाश माळी, मोनिका लोखंडे, माधुरी आखरे आणि राधा पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन स्वलिखित काव्यवाचन केले. परीक्षक डॉ. रणजीत पारधे यांनी कवितांतील आशय, मांडणी, शब्दवैभव आणि सादरीकरण या निकषांवर परीक्षण करून मार्गदर्शनपर अभिप्राय दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वाती तायडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नयन वळवी व गंगा चौधरी तर आभार प्रदर्शन जागृती भामरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री संदीप वाघ आणि श्री योगेश कोरडेवाड शिक्षणशास्त्र विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी जयेश पाटील, विवेक भावसार आणि विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता